Estd. 1962
"A++" *Accredited*
*by* NAAC (2021)
with CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**416 004, MAHARASHTRA**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**४१६ ००४, महाराष्ट्र**
सेमिनार विभाग फोन नं. ०२३१-२६०९१४१
www.unishivaji.ac.in, pgseminar@unishivaji.ac.in

जा.क्र. शिवाजी वि./सेमिनार/ 465 दि. 18 APR 2026

## परिपत्रक

प्रति,

1. अधिविभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

विषय: नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिक्षकांसाठी शिबीर / कार्यशाळा आयोजनाबाबत.....

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, सन 2026 -2027 या वर्षासाठी नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात शिबीर/कार्यशाळा आयोजनाचे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. इच्छुक अधिविभाग /महाविद्यालयांनी आपल्या अधिविभागाच्या/महाविद्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात आलेल्या लिंक वरील Google form मध्ये माहिती भरून त्याची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी. यासाठीची नियमावली व प्रस्तावाच्या विहित नमुना माहितीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in **→Circular→Affiliation→Seminar Section** या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| 1 | महाविद्यालयीन शिबीर /कार्यशाळा आयोजन प्रस्तावाची ऑनलाईन पूर्तता करून त्याची प्रत दि. 11 /05/2026 पर्यंत विद्यापीठ कार्यालयात सादर करावी. |
| 2 | महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव संबंधित समितीच्या बैठकीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील.त्यानंतर शिबीर/कार्यशाळा आयोजनासाठी प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर किवा नामंजूर झाल्याचे कार्यालयाकडून कळविणेत येईल. |
| 3 | विद्यापीठाकडून मंजुरीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांनी शिबीर कार्यशाळा आयोजन लवकरात लवकर करावे. |

वरील बाबी विचारात घेऊन महाविद्यालयांनी दि .11/05/2026 पर्यंत प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयात सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. महाविद्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने महाविद्यालयास त्यांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचे ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारींची दाखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

सहायक कुलसचिव

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# Proposal For New Changed Syllabus Training / Workshop

1) Faculty : ------------------------------------

2) Subject : ------------------------------------

3) Class and Paper No. & : ------------------------------------

3.1) Course Code : ------------------------------------

4) Workshop : ------------------------------------

5) Co-ordinator : ------------------------------------

6) Duration : ---------------------------------

7) Dates : ------------------------------------

8) No. of Resource Persons : ------------------------------------

9) A list of Resource Persons : ----------------------------------

No. of Participants : ------------------------------------

A) Outstation Participants : ----------------------------------

B) Local Participants : -----------------------------------

10) Estimated Expenditure : ------------------------------------

A) T.A. & D.A. to Resource Persons :------------------------------

B) Remuneration to Resource Persons : ------------------------------

C) Xeroxing and other expense : ------------------------------

D) Miscellaneous expenses : ------------------------------

Total Rs. -----------------------------

Name & Signature of Co-ordinator

Signature of Principal / Director with Stamp

Scanned with OKEN Scanner

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## नियमावली

नवीन बदललेल्या अभ्यासक्रमासंदर्भात आयोजित केल्या जाणाऱ्या महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रशिक्षण शिबीर /कार्यशाळा संदर्भात मार्गदर्शक सूचना

| | |
|---|---|
| 1 | प्रशिक्षण शिबीरासाठी/ कार्यशाळेसाठी शिक्षकांकडून नोंदणी फी आकारू नये. |
| 2 | शिबीराच्या वेळी संबंधित शिक्षकांना नाष्टा, चहापान व वर्किंग लंच द्यावा. यासाठी कमाल खर्चाची मर्यादा प्रत्येकी रू.125 राहील. शिबीरास मदत करणा-या महाविद्यालयामधील अधिकच्या जास्तीत जास्त 10 शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना भोजन खर्च मान्य केला जाईल. |
| 3 | प्रशिक्षणासाठी अत्यावश्यक असलेले संदर्भ साहित्य, झेरॉक्स, पेन, फाईल इ. शिक्षकांना उपलब्ध करून द्यावे, त्यासाठी प्रती शिक्षकास रू. 50 इतका खर्च मान्य राहील. |
| 4 | शिबीर कार्यक्रमाच्या वेळी जास्तीत जास्त वेळ हा शिबीरार्थींना मार्गदर्शक करण्यासाठी उपयोगात आणावा. उद्‌घाटन समारंभासाठी जास्तीत जास्त 30 मिनीटे वेळ देण्यात यावा. तसेच, त्यासाठी रू.500 एवढाच खर्च मान्य राहील. |
| 5 | शिबीरास हजर राहणा-या शिक्षकांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येऊ नये. |
| 6 | बीजभाषकास प्रवास खर्च व रू.500 इतके मानधन देण्यात यावे. |
| 7 | मार्गदर्शक तज्ञांना त्यांचा प्रवास खर्च, विद्यापीठ नियमाप्रमाणे आदा करावा. तसेच प्रत्येक व्याख्यानासाठी रू.300 प्रमाणे मानधन देणेत यावे. |
| 8 | बीजभाषक, तसेच मार्गदर्शक तज्ञांच्या निबंधाच्या झेरॉक्स प्रती देयकांसोबत विद्यापीठाकडे सादर कराव्यात. |
| 9 | शिबीरास / कार्यशाळेसाठी हजर राहणा-या शिक्षकांची आवशक्य असल्यास राहण्याची व्यवस्था संबंधित आयोजक महाविद्यालयाने विना मोबदला करून द्यावी. |
| 10 | सदर प्रशिक्षण शिबीरास / कार्यशाळेसाठी हजर राहणा-या शिक्षकांना आयोजक महाविद्यालयाने उपस्थिती प्रमाणपत्र (**Attendance Certificate**) द्यावे. |
| 11 | विद्यापीठ परिसरातील अधिविभागामध्ये आयोजित केल्या जाणा-या शिबीरास उपस्थित राहणा-या शिक्षकांची राहण्याची व्यवस्था विद्यापीठाने करावी. |
| 12 | सदर शिबीरास उपस्थित राहणा-या शिक्षकास कार्यरत रजा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मंजूर करावी. |
| 13 | विद्यापीठाने मंजूर केलेल्या रक्कमेच्या 80% रक्कम तसलमात म्हणून संबंधित महाविद्यालयास पाठविण्यात यावी. |
| 14 | शिबीर समाप्तीनंतर 05 दिवसांच्या आत संबंधित संयोजकांनी (प्राचार्यांनी/ पदव्युत्तर विभागप्रमुखांनी) शिबीराच्या खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बीले महाविद्यालयाने आपल्याकडे ठेवावीत आणि फक्त विहित नमुन्यामधील चार्टर्ड अकौंन्टट यांनी प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (**Utilization Certificate**)विद्यापीठ कार्यालयास पाठवून द्यावे. (तथापि शिबीर खर्चाचा संपूर्ण हिशोब व मूळ बील विद्यापीठ कार्यालयाच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे आयोजक महाविद्यालयास बंधनकारक राहील.) तसेच उपयोगिता प्रमाणपत्रासोबत शिबीराचा सविस्तर अहवाल, शिबीर/ कार्यशाळेसाठी उपस्थित असणा-या शिबीरार्थींच्या नावाची यादी इ. कागदपत्रे विद्यापीठास सादर करावीत. |

Scanned with OKEN Scanner